स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

'मानव्य विद्याशाखेअंतर्गत मराठी विषयातील पीएच.डी.
विद्यावाचस्पती(पीएच.डी.) पदवीसाठी सादर करावयाचा
शोध प्रबंधाचा आराखडा

मराठवाडयातील निवडक विद्रोही ग्रामीण कवितेचा विवेचक अभ्यास

(इ.स.२००० ते २०२०)

संशोधक

अंगद सुभाष जाधव

मार्गदर्शक

डॉ.म.ई.तंगावार

मराठी विभाग

श्री हावगीस्वामी महाविद्यालय,उदगीर

संशोधन केंद्र

श्री हावगीस्वामी महाविद्यालय उदगीर जि.लातूर

2019

“मराठवाडयातील निवडक विद्रोही ग्रामीण कवितेचा विवेचक अभ्यास ”

(इ.स.२००० ते २०२०)

प्रस्तावना

ग्रामीण साहित्य हा आधुनिक मराठी साहित्यातील महत्वाचा साहित्यप्रवाह आहे. १९६० नंतर ग्रामीण भागात महत्त्वाचे बदल होत गेले.शेतीतील अवजारे तंत्रज्ञानात बदल झाले.पारंपरिक पध्दतीने शेती करण्याची सवय असलेले शेतकरी पिढी वाढत्या भांडवली खर्चामुळे व्यापा-यांच्या लुटीच्या धोरणामुळे गांगरुन गेली.उत्पन्न्आणि खर्च यांचा ताळमेळ काही जमत नव्हता.हे सर्व ग्रामीण वास्तव अनुभवणारी आणि आपल्या साहित्यातुन आभिव्यक्त करणारी पिठी १९६०च्या नंतर मराठी साहित्यात उदयाला आली.

ज्या कवितेमध्ये ग्रामीण जनजीवनाचे चित्रण ग्रामीण संवेदनशीलतेने केलेले असते त्या कवितेला ग्रामीण कविता असे म्हटले जाते.या कवितेत खेडे आणि त्यांच्याशी संबंधित असलेले शेती जीवन, जनजीवन,सुखदु:खे तेथील अर्थार्जन दारिद्रय, रुढीपरंपरा,संस्कृती वअंधश्रध्दा या सा-या गावगाडयाबरोबरच तेथील निसर्ग, स्त्रीजीवन, वातावरण, भाषा या सा-या घटकांचा समावेश अभिप्रेत आहे.

ग्रामीण साहित्याची सुरुवातच महात्मा फुले यांच्या संमग्र साहित्यातून आलेली आपणास दिसून येते. त्यांच्या ‘शेतक-याचा आसूड’ असेल किंवा ‘अखंड’यातून त्यांनी शेती आणि शेतकरी याच्या व्यथा जाणिवा आपल्या साहित्यातून मांडल्या आहेत1924च्या आसपास ‘मीठ भाकर’आणि ‘सुगी’या संग्रहाच्या माध्यमातून कवितेच्या रुपाने ग्रामीण जीवनाचे चित्रण रेखाटले जाऊ लागले इतरही काही कवीनी जमेल तसे ग्रामीण जीवनाचे चित्रण करण्याचा प्रयत्न केला.

१९६० नंतर ग्रामीण साहित्य् लेखणीला बळ मिळाले १९२० नंतर सुरु झालेले ग्रामीण साहित्य नंतर वास्तवाचे चित्रण करु लागले साठनंतर सामान्य माणसाचे जगणे केंद्रस्थानी ठेवून ग्रामीण जीवनाची शोकांतिका नोंदवू लागले.सत्तरनंतर हे साहित्य नकार आणि विद्रोह व्यक्त करु लागले .

एकविसाव्या शतकात राजकीय पातळीवर खूप बदल झाले शेती विषयी शेतक-याविषयी शासकीय पातळीवर उदासिनता दिसू लागली .त्यातून जे काही योजना आहेत ते शेतक-यापर्यंत पोहचत नाहीत यातून दारिद्रय,नैराश्य,वेदना,वेथा आणि आत्महत्येचे दुष्ठ चक्र सुरु झाले.एका बाजुने दुष्काळ दुस-या बाजुने भांडवलदार,व्यापा-याकडुन होणारे

शोषण वाढती सुशक्षित बेकारी समाजातील सत्तेतील हुकूमशाही प्रवृती यातून ग्रामीण कविता वेगळया वळणावर जाऊन पोहचल्या .

अन्याय,अत्याचार,संघर्ष ,पोटाची आग यातून ग्रामीण विद्रोही कवितेचा जन्म झाला.अनेक कवीनी कवितेतून विद्रोही जाणिवा व्यक्त केल्या आहेत त्यात केशव देशमूख ‘अथक’,संदीप जगताप ‘भुईभोग’,रमेशचिल्ले ‘नांगरून पडलेले शतक’, कैलास दौंड ‘भोग सरु दे उन्हाचा’,बालाजी इंगळे ‘मातरं’,ललित अधोन ‘कुणबी बाप’,बालाजी इंगळे ‘मेलं नाही अजुन आभाळ,’मुरहरी कराड ‘गोपनीतून दगड निसटण्यापूर्वी,’अशा कितीतरी कवितासंग्रहातून कवीने आपल्या लेखणीतून ज्वाला पेटविण्याचे काम केले आहे.आपल्या विद्रोही भावनांना वाट मोकळी करून दिली आहे.

संशोधनाचे महत्त्व

प्रस्तुत विषयाचा विचार करता ग्रामीण कवितेतून आजपर्यंत ग्रामीण चालीरीती अंधश्रध्दा खेडे,ग्रामीण जीवन,शेती,श्रध्दा,कुळ याभोवती लेखन गुंफून होते.पुढे दलित साहित्यातील विद्रोह हा ग्रामीण जीवनातील संघर्षातून उदयास आला.

एकविसाव्या शतकात आजचा ग्रामीण समाज जागतिकीकरणाच्याविळख्यातून बाहेर येऊ पाहातोय राजकीय सत्तेतील लोकांचे ग्रामीण जीवनाकडे झालेले दुर्लक्ष.यातूनसुशिक्षित बेरोजगार स्वत:अनुभवलेले चटके सोसलेल्या वेदना त्यांच्यात आक्रसताळेपणा सत्यपणाची जाणीवेतून उन्मळुन येणारा रागआपल्या काव्यातून आणला.आणि विद्रोही कविता लिहिण्यास सुरुवात झाली.

ग्रामीण साहित्यात सुरुवातीला या जाणीवा परिवर्तवादी परंपरागत शोषणाविरुध्द उभे राहाणा-यानव्हत्या;पण एकविसाव्या शतकातील नवकवीनी विद्रोही जाणिवा मांडलेल्या आहेत.म्हणून प्रस्तूत संशोधनात या विषयाला महत्त्व् आहे.

मर्यादा आणि व्याप्ती

मराठवाडयातील कविता ही प्रस्तुत संशोधनाची व्याप्ती आहे.त्याच बरोबर केवळ मराठवाडयातील ग्रामीण कवितेतील विद्रोही जाणिवा ही संशोधनाची मर्यादा आहे.म्हणजेच मराठवाडयातील 2000 ते २०२० पर्यंत प्रकाशित कवितासंग्रह तसेच अप्रकाशित विद्रोही ग्रामीण कविता यांचा समावेश संशोधनात असेल.

गृहीतके

1. मराठवाडयातील ग्रामीण कवितेत विशेषत:एकविसाव्या शतकातसामाजिक राजकीय,आर्थिक,नैसर्गिक कारणामुळे ग्रामीण कवितेत विद्रोह निर्माण झालेला आहे.

2. मराठवाडयातील ग्रामीण कवतित आलेल्या विद्रोहास जागतिकीकरण कारणीभूत आहे.

3. मराठवाडयातील ग्रामीण कवितेतील विद्रोह हा परिस्थितीशी दोन हात करणा-या सुशिक्षित बेकाराचा ग्रामीण शेतक-याच्या दाहक अनूभवाचे वास्त्व दर्शन आहे.

4. मराठवाडयातील ग्रामीण विद्रोही कवितेत भाषिक वैविध्यआहे .

संशोधन पध्दती

मराठवाडयातीलविद्रोहीग्रामीण कवितेचा विवेचक अभ्यास या शोध प्रबंधासाठी वर्णनात्मक,विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात येणार आहे. काही निवडक कवीच्या मुलाखती घेतल्या जातील.ग्रामीण कवितेतील विद्रोह हा दलित कवितेतील विद्रोह पेक्षा वेगळा कसा आहे.किंवा या दोन्ही प्रवाहातील या भेदावर प्रकाश टाकताना काही ठिकाणी तुलनात्मक संशोधन पध्दतीचा वापर केला जाईल .

उद्दिष्टे

“मराठवाडयातील निवडक विद्रोही ग्रामीण कवितेचा विवेचक अभ्यास ” (२००० ते २०२०) या संशोधन विषयाच्या अनुषंगाने पुढील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

1. एकविसाव्या शतकातील (2000ते २०२० आजतागायत) विद्रोही ग्रामीण कवितेचा शोधघेणे.

2. विद्रोही ग्रामीण कवितेतील कवींच्या जाणीवांचा अभ्यास करणे.

3. विद्रोही ग्रामीण कविता ही दलित विद्रोही कवितेपेक्षा वेगळी कशी आहे ते सांगणे.

4. मराठवाडयातील विद्रोही कवितेच्या भाषिक वैविध्याचा शोध घेणे.

प्रकरण रचना

प्रकरण पहिले

मराठवाडयातील ग्रामीण कवितेची परंपरा :-

मराठवाडा ही संताची भूमी आहे तसेच संघर्षाची भूमी देखील आहे.तेराव्या,चौदाव्या शतकापासून आजपर्यंतविविध प्रकारची साहित्य रचना मराठवाडयात झालेली आहे.

मध्ययुगीन काळात,स्वातंत्र्यपूर्वकाळ व विसावे शतकात या काळातील मराठवाडयातील ग्रामीण कवितेची परंपरा आहे मध्ययुगापासून आजपर्यंत कविनी आपल्या साहित्यातून समाजमनाचे प्रतिबिंब सादर करण्याचा प्रयत्न केलेला आहे.त्यातून स्त्रीयांचे दु:ख,शेतक-यांनी दयनीय अवस्था उधवस्त समाजजीवन अशा कितीतरी विषयावर अनेक ग्रामीण कवींनी विद्रोह व्यक्त केलेला दिसुन येतो.

प्रकरण दुसरे

विद्रोह संकल्पना व स्वरुप:-

विद्रोही साहित्याची संकल्पना आणि स्वरुप यांचा अभ्यास करताना द्रोह-विद्रोह शब्दविस्तार द्रोह –विद्रोह समज गैरसमज विद्रोहाच्या विविध व्याख्या स्पष्ट् करून विविध काळातील विद्रोहाच्या इतिहास आणि स्वरुप अभ्यासण्यात येणार आहे.महात्मा ज्योतीबा फुले यांच्या प्रेरणेतून दलित व ग्रामीण साहित्यातविद्रोही साहित्याची प्रगल्भतेने निर्मिती झाल्यामुळे सामाजिक व्यवस्थे विरुध्द आवाज बुलंद झाला.यामुळे वंचित घटकांचे श्वास मोकळे झाले.

एकविसाव्या शतकात परिवर्तनाच्या चळवळीतून आलेल्या आत्मभानातून आत्मशोध घेतला गेला आणि जुलमी व्यवस्था नाकारुन नवी समतधिष्ठीत समाजव्यवस्था आणण्यासाठी विद्रोही जाणिवा व्यक्त् झाल्या.

एंकदरीत साहित्यातविद्रोही जाणिवा कशामुळे येतात हे या संकल्पनेच्या आधारे स्प्ष्टीकरण करावयाचे आहे.

प्रकरण तिसरे

मराठवाडयातील ग्रामीण विद्रोही कवितेचे स्वरुप:-

१९२४ च्या आसपास काही कवीनी मराठी ग्रामीण कविता लिहीण्याचा प्रयत्न केला असला तरी या काळातल्या कवितेवरती वास्तवापेक्षा काल्पनिकत्तेवर भर असल्याचा आक्षेप अभ्यासकाकडून झालेला आहे.

१९८० च्या आसपास ग्रामीण मराठी कवितेला वेगळे वळण लागले. कविता वास्तवतेचे भान ठेवून लिहीली जाऊ लागली.कवितेचा प्रवाह शहराकडून ग्रामाकडे वळला.नव्वदच्या दशकानंतर ग्रामीण कवितेत नवे कवी उदयास आले.एकविसाव्या शतकात अलिकडच्या कवितेत इंद्रजित भालेराव, केशव देशमुख,श्रीकांत देशमुख,भास्कर

बडे,रमेश चिल्ले,गंगाधर बनबरे,प्रकाश होळकर व इतरही काही कवी महत्वाचे मानले जातात.

या कवीनी ग्रामीण वास्तव जीवनाचा परिचय त्यांनी बंडाची भावना संघर्षाची ,विद्रोहाची भावना आपल्या कवितेतून मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे काही कवींच्या कविता ग्रंथरुपाने प्रकाशित झाले नाहीत.परंतु त्यांच्या कवितेत विद्रोही जाणीवा पाहायला मिळतात .याचा विस्ताराने अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करायाच आहे .

प्रकरण चौथे

मराठवाडयातील ग्रामीण विद्रोही कवितेचे भाषिक वैविध्् :-

मराठवाडयातील एकविसाव्या शतकातील कवितेचे भाषिक वैविध्य हे विविध प्रकारचे आहे .

मराठवाडी बोली यांच वेगळपण आपल्याला या विद्रोही ग्रामीण कवितेतून पहावयास मिळते.तसेच ग्रामीण समाजमनाच्या वास्तवतेचा प्रभाव विद्रोही कवितेत आहे .जीवनातील विविध चढउताराची ग्रामीण समाजाच्या परिवर्तनाची शेतक-याची भाषा या ग्रामीण विद्रोही कवितेतून पहावयास मिळते.या कवितेतून आपल्याला मराठवाडी बोलीतील शब्द, वाक्यप्रचार,म्हणी,ग्रामीण शीवी अशा प्रकारची विविधता भाषिक सौंदर्य या विद्रोही ग्रामीण कवितेतून दिसून येते.

प्रकरण पाचवे

निष्कर्षात्मक समारोप :-

मराठवाडयातील विद्रोही ग्रामीण कवितेचा एकविसाव्या शतकाच्या संदर्भात वरील प्रकरणाच्या माध्यमातून जो अभ्यास केला गेला आहे .त्याच्या आधारे निष्कर्ष काढून त्याचे विश्लेषण प्रस्तुत प्रकरणात करण्यात येईल .

मार्गदर्शक
डॉ.म.ई.तंगावार
श्री हावगीस्वामी महाविद्यायालय
उदगीर जि.लातूर

संशोधक
अंगद सुभाष जाधव

ग्रंथसुची :

१. देशमुख केशव : ‘अथक ’, पदमगंधा प्रकाशन , पुणे
प्रथमावृत्ती २०१०

२. भालेराव इंद्रजित : ‘ टाहो ’ , प्रतिभास प्रकाशन , परभणी
तृतीयावृत्ती २००८

३. भालेराव इंद्रजित : ‘ पेरा ’, जनशक्ती वाचक चळवळ औरंगाबाद ,
तृतीयावृत्ती २०१०

४. अधाने ललित : ‘ कुणबी बाप ’ ,चिन्मय प्रकाशन , औरंगाबाद ,
व्दितियावृत्ती २००७

५. इंगळे बालाजी : ‘ मेलं नाही अजून आभाळ ....’ ,लोकवाड्मय गृह
प्रथमावृत्ती २०१०

६. चिल्ले रमेश : ‘ नांगरून पडलेलं शतक ’ , अरिहंत पब्लिकेशन , पुणे ,
व्दितियावृत्ती २०१३

७. कदम जगदिश : ‘ नामदेव शेतकरी ’ ,निर्मल प्रकाशन , नांदेड
प्रथमावृत्ती २००६

८. दुधाळ कल्पना : ‘ सिझर कर म्हणतेय माती ’ , नवसिध्दांत प्रकाशन नाशिक ,
प्रथमावृत्ती २०१०

९. देशमुख केशव : ‘ पाढा ’ , साक्षात प्रकाशन , औरंगाबाद ,
प्रथमावृत्ती २००६

१०. कोत्तापल्ले नागनाथ : ‘ ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि शोध ’, स्वरूप प्रकाशन ,औरंगाबाद तृतीयावृत्ती २००७

११. कदम महेंद्र : ‘ कवितेची शैली ’, भूमी प्रकाशन ,लातुर
प्रथमावृत्ती २००७

१२. डहाके वसंत : ‘ कवितेविषयी ’ , स्वरूप प्रकाशन , औरंगाबाद
प्रथमावृत्ती १९९९